# श्री. अरविंद घोष यांचे शैक्षणिक विचार

श्री. अमरदीप अशोक रामराजे
*सहाय्यक प्राध्यापक*
*मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एकलहरे, नाशिक*

श्री. अरविंद घोष हे भारतीय तत्वज्ञानाचे अभ्यासक होय. त्यांचे विचार, तत्त्वज्ञान हे वेदान्तवर आधारित होते. अरविंद यांचा जन्म कोलकत्ता येथे 15 ऑगस्ट 1872 साली झाला. त्यांचे वडील डॉक्टर कृष्णधन घोष होय. ते प्रसिद्ध डॉक्टर होते. आईचे नाव स्वर्णलता देवी असे होते. अरविंद घोष यांच्या वडिलांची इच्छा होती की, श्री. अरविंद घोष यांच्यावर पाश्चात्य संस्कृतीचा पगडा बसावा. यासाठी त्यांनी त्यांना इंग्लंडमध्ये शिक्षण घेण्यासाठी पाठवले. श्री. अरविंद घोष यांनी लॅटिन, इंग्रजी, फ्रेंच त्याचसोबत गणित, इतिहास, भूगोल या विषयांचा अभ्यास केला. त्यांना वांड. मयाबद्दल आवड होती.

Golbal Oline Electronic International Reserch Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**श्री. अरविंद घोष यांचे शिक्षण विषयक ग्रंथ**

1. ऑन एज्युकेशन
2. नॅशनल सिस्टम ऑफ इंडियन कल्चर
3. द फाउंडेशन ऑफ इंडियन कल्चर

**श्री. अरविंद घोष यांचे अध्यात्मिक विषयक ग्रंथ**

1. लाईफ डिव्हाइन
2. सिंथेसिस ऑफ योग
3. द आयडियल ऑफ ह्युमन युनिटी
4. ऑन द वेद
5. द मदर
6. लाईट्स ऑफ योग
7. एसेस ऑन द गीता

**श्री. अरविंद घोष यांनी सुरू केलेली वर्तमानपत्रे**

1. युगांतर
2. वंदे मातरम
3. कर्मयोगी
4. आर्य
5. धर्म

**श्री. अरविंद घोष यांचे शिक्षण विषयक तत्वज्ञान**

श्री. अरविंद घोष यांच्या मते शिक्षण हे व्यक्तीचा विकास होण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. व्यक्तीचा मानसिक, बौद्धिक, शारीरिक, अध्यात्मिक व आंतरिक शक्तींचा शिक्षणाद्वारे विकास

होणे अपेक्षित आहे. मन, बुद्धी, आत्मा, यांचे एकत्रीकरण म्हणजे व्यक्ती होय. म्हणून आत्म्याचा विकास होणे फार महत्त्वाचे आहे. व्यक्तीच्या शारीरिक विकासाशिवाय आत्म्याचा विकास होऊ शकत नाही. शिक्षणाद्वारे व्यक्तीमध्ये बंधुत्वाची भावना वाढीस लागण्यास मदत होत असते. व्यक्तिला स्वयंअध्ययन करण्यास प्रवृत्त करावे. जेणेकरून त्याला आपले ज्ञान ओळखण्यास मदत होईल. नवीन ज्ञान प्राप्त करण्याची त्याच्यामध्ये जिज्ञासा निर्माण होईल. यासोबत स्वयंशोधावर भर देणे गरजेचे आहे. बालकाला अध्यापन करताना त्याची अध्ययनाची मानसिक तयारी आहे की नाही हे बघणे गरजेचे आहे. त्याची शिक्षणामध्ये अभिरुची निर्माण होणे गरजेचे आहे. त्यासाठी योग्य अशा मानसशास्त्र अध्यापन पद्धतींचा वापर करणे आवश्यक ठरते. शिक्षण हे विचारांचे आदान–प्रदान करण्याचे एक महत्त्वाचे असे साधन आहे. इतर देशांची शिक्षण पद्धती व आपल्या देशाच्या शिक्षण पद्धतीची देवाण–घेवाण करण्यासाठी भाषेचा वापर करावा लागतो .यासाठी बालकाला परकीय भाषांची माहिती असणे आवश्यक ठरते. श्री. अरविंद घोष यांनी शिक्षणाने अंतराष्ट्रीयत्वाची भावना जागवण्यासाठी पॉंडिचेरी आश्रमात आंतरराष्ट्रीय विद्यापीठ केंद्र स्थापन केले होते. श्री. अरविंद घोष यांच्या मते शिक्षकाची भूमिका ही मार्गदर्शकाची असावी. शिक्षकाने बालकांना स्वयं शिकण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. त्याचबरोबर जर त्यांना काही अडचणी येत असल्यास शिक्षकाने त्याबद्दल त्यांना मार्गदर्शन करावे. श्री. अरविंद घोष यांच्या मते प्रत्येक व्यक्तीमध्ये काही दैवीगुण असतात. यासाठी शिक्षणाद्वारे बालकांच्या दैवगुणांचा शोध घेणे आवश्यक ठरते. बालकांच्या अध्यात्मिक विकासासाठी शिक्षणाचा वापर करणे महत्त्वाचे ठरते. बालकांवर योग्य संस्कार शिक्षणाद्वारे केल्यास त्यांच्यातील गुणांची वाढ करता येते. बालकाच्या कृती प्रमाणे त्याचा सर्वांगीण विकास करावा असे अरविंद घोष यांना वाटत होते.

**श्री. अरविंद घोष यांचे शिक्षण विषयक ध्येय**

1. **आत्मिक विकास** – शिक्षणाचे महत्त्वपूर्ण ध्येय म्हणजे आत्मिक विकास होय. हा आर्थिक विकास शिक्षणाद्वारे परमेश्वरचया सान्निध्यात जाऊन व्हायला पाहिजे.

2. **शारीरिक विकास** – शरीराच्या माध्यमातून धर्माची साधना होते. त्यामुळे फक्त शारीरिक शिक्षण यावरच लक्ष केंद्रित न करता शारीरिक शक्तीचा अंतर्भाव त्यामध्ये करण्यात आलेला आहे. शारीरिक विकास व शुद्धी त्यांच्यातूनच शारीरिक विकास होतो.

3. **ज्ञानेंद्रियांचा विकास** – व्यक्तीचे डोळे, नाक कान, त्वचा या ज्ञानेंद्रियांचा विकास होणे फार महत्त्वाचे आहे. मन हे निरोगी असेल तरच ज्ञानेंद्रियांचा विकास योग्य पद्धतीने घडून येतो. ज्ञानेंद्रियांचा विकास करण्यासाठी शिक्षण व योग यांची गरज असते.

4. **वैयक्तिक चारित्र्य व राष्ट्रीय चारित्र्याचा विकास** – नैतिकतेमधूनच वैयक्तिक चारित्र्याचा

विकास होतो आणि हेच राष्ट्रीय चारित्र्य घडवण्यासाठी महत्त्वाचे ठरते. बालकाचे वैयक्तिक व राष्ट्रीय चारित्र्य हे एकमेकांशी संबंधित असतात. त्यामुळे शिक्षणातून या दोघांचाही विकास घडून आणणे महत्त्वाचे ठरते.

6. **व्यक्तिगत क्षमतांचा विकास** – प्रत्येक व्यक्तीमध्ये विविध अशा क्षमता असतात. या क्षमतांचा विकास आज शिक्षणानेच होऊ शकतो म्हणून या क्षमतांचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय फार महत्त्वाचे आहे.

7. **ज्ञान व कृती यांचा समन्वय** – ज्ञान व कृती यांचा शिक्षकाने समन्वय साधणे आवश्यक आहे. शिक्षकांनी ज्ञान कृतीत उतरण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करावे.

8. **आंतरिक शक्ती** – प्रत्येक व्यक्तीमध्ये जन्मतः शारीरिक मानसिक चैतन्ययुक्त अशा काही आंतरिक शक्ती असतात या सर्वांचा एकात्मिक विकास करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे ध्येय आहे.

9. **मानवतावाद** – शिक्षणाचे ध्येय म्हणजे मानवतेची जडण–घडण करणे होय. मानवातील इच्छाशक्तीचा विकास हे शिक्षणाचे महत्त्व पूर्ण ध्येय होय.

10. **राष्ट्रीयता व आंतरराष्ट्रीय यामध्ये समन्वय** – पॉडेचेरी येथे श्री. अरविंद घोष यांनी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ केंद्र स्थापन केले. त्यांनी संकुचित राष्ट्रवादाला विरोध करून आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीयता यामध्ये समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

**श्री. अरविंद घोष यांची शिक्षण पद्धती**

श्री. अरविंद घोष यांच्या मते शिक्षण हे मातृभाषेतूनच असावे. त्यामुळे अवघड विषय समजून घेणे सोपे जाते. विद्यार्थ्यांना स्वतः अनुभव घेण्यास प्रवृत्त करावे. त्यामुळे स्वयंप्रेरणेने विद्यार्थी शिक्षणाकडे आकर्षित होईल असा त्यांना आत्मविश्वास होता. स्वयंप्रेरणा व स्व अनुभव यामधून प्राप्त केलेले ज्ञान बालक उत्साहाने ग्रहण करत असतो व त्यामुळे त्याच्यामध्ये योग्य अशा क्षमता निर्माण होत असतात. बालकाला शिकण्याचे स्वातंत्र्य द्यायला हवे. त्यामुळे ते जास्तीत जास्त ज्ञान मिळवण्याकडे भर देतो. श्री. अरविंद घोष यांच्या मते बालकावर जर बंधने लादली गेली तर त्यांचे शिक्षणाकडे लक्ष लागणार नाही व त्यांचा विकास हा कमी होईल. त्यांच्या मते प्रत्येक बालकांमध्ये काहीतरी ईश्वरी अंश असतो. त्याला चालना देण्याचे काम हे शिक्षकाने करणे आवश्यक ठरते. बालकाच्या सुप्त गुणांना चालना देण्यासाठी व त्यांच्यात विकास करण्यासाठी त्यांच्या स्वभावानुसार संधी उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. विद्यार्थ्याला शिकण्याची संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षकाचे काम आहे. शिक्षकाने प्रत्येक बालकाची शिकण्याकडे व कोणत्या विषयाकडे त्याची आवड आहे ? याची तपासणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार त्याला शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. त्यामुळे त्याला शिकण्याची आवड निर्माण होईल. अध्यापन करताना प्रत्येक बालकाला प्रेम व

सहानुभूती दाखवणे आवश्यक आहे. त्यामुळे अध्यापनाकडे जास्तीत जास्त आकर्षित होईल. त्याचा दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होईल. श्री. अरविंद घोष यांच्या मते शिक्षक व विद्यार्थी यामध्ये सहकार्य असणे आवश्यक आहे. कारण सहकार्याशिवाय कोणतेही काम यशस्वी होऊ शकत नाही शिक्षकाने विद्यार्थ्यांना अध्यापन करताना त्यांना सहकार्य मिळेल असा प्रयत्न करावा.

संदर्भसूची –


1. राजमाने, क.च ( 2011 ). शिक्षणातील थोर विचारवंत : एक चिंतन, नाशिक : इनसाईट पब्लिकेशन
2. घोरमोडे, के.यु व घोरमोडे, क.क. ( 2012 ). शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, नागपुर : विद्या प्रकाशन
3. https://en.wikipedia.org/wiki/Sri_Aurobindo
4. https://www.britannica.com/biography/Sri-Aurobindo